संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# लाचखोरांना दणका देणारी नवी उपाययोजना

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात लाचखोरांविरुध्द लाचलुचपतविरोधी विभागाने जोरदार मोहीम उघडली आहे. आता याच लाचखोरांभोवतीचा फास आणखीन आवळण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत लाच घेताना जो अधिकारी किंवा कर्मचारी सापडत होता त्याच्यावर कारवाई केली जात होती. आता मात्र त्यांच्या कुटुंबियांनासुध्दा या गुन्ह्यातले सहआरोपी करण्याचा धाडसी निर्णय लाचलुचपत विरोधी विभागाने घेतला आहे. बऱ्याचवेळेला या लाचखोरांकडे प्रचंड बेहिशेबी मालमत्ता सापडते किंवा त्यांच्या घरात बँकांमधल्या लॉकर्समध्ये मोठी रोख रक्कम दडवलेली असते. तर काही वेळेला लाचखोरीतून जमा केलेला पैसा इन्कमटॅक्स विभागाला दाखविता येत नाही. म्हणून ही रक्कम आपल्या कुटुंबीयांच्या नावे बँकांमध्ये जमा करण्याची युक्ती केली जाते. याचा अर्थ लाचखोरीतून पैसा कमवायचा आणि तो कुटुंबीयांच्या नावे दाखवून जप्त होणार नाही याची काळजी घ्यायची. हा प्रकार अनेक लाचखोरांबाबत होत असतो. अशावेळी बेहिशेबी रक्कम जप्त करणे या विभागाला अडचणीचे ठरत होते. याशिवाय लाचखोरीमध्ये सहभागी असणारे कुटुंबीय या गुन्ह्यापासून मोकळे राहत होते. ही त्रुटी किंवा उणीव दूर करण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलले गेले आहे. भ्रष्टाचाराविरुध्द मोहीम अधिक प्रामाणिकपणे राबवायची असेल आणि लाचखोरावर जरब किंवा धाक निर्माण करायचा असेल तर अशाच कडक उपायाची आवश्यकता होती. आता या उपाययोजनांना सत्ताधाऱ्यांनी पाठिंबा दिला पाहिजे किंवा त्याची काटेकोर अंमलबजावणी होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा या विभागाने सुरू केलेल्या या आक्रमक मोहिमेला राजकीय खो घालण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

### अभिनव कारवाईची महाराष्ट्रात सुरुवात

एकीकडे भ्रष्टाचाराविरुध्द लोकांमध्ये चीड निर्माण झाली आहे. सगळे राजकारणी किंवा पंतप्रधान नरेंद्र मोंदीपासून अनेक नेते भ्रष्टाचार निपटून काढण्याची भाषा करीत असतात. परंतु हा भ्रष्टाचार कोणत्या उपायाने नाहीसा करणार हे कोणीच धडपणे सांगत नाही. सुदैवाने महाराष्ट्रातील लाचलुचपत विरोधी पथकाने गेल्या वर्षभरात जी धडाडी दाखविली ती कौतुकास्पद ठरते. आतादेखील ज्या कारणांमुळे ही नवी उपाययोजना करण्याचे ठरवावे लागले. त्यामागे काही उदाहरणे समोर आली. अंधेरी इथल्या एका सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याला १५०० रुपयांची लाच घेताना पकडले गेले होते. त्यावेळी त्याच्याकडे ८४ लाख रुपये रोख सापडले आणि या विभागाने अधिक चौकशी केल्यानंतर त्याच्या पत्नीच्या नावाने तब्बल १ कोटी १६ लाखांची मालमत्ता असल्याचे आढळून आले. त्यामध्ये १ कोटी रुपये बेहिशेबी असल्याचे दिसून आले. याचा अर्थ लाचखोरीमधून वाट्टेल तसा पैसा ओरबाडायचा आणि तो पत्नी मुले आई-वडील यांच्या नावाने दाखवायचा असा प्रकार सऱ्हासपणे होत असल्याचे दिसून आले. महाराष्ट्रातील काही बड्या लाचखोर अधिकाऱ्यांनी तर शेकडो एकर जमिनी घेऊन हा पैसा दडवण्याचा प्रयत्न केला. कुटुंबीयांच्या नावे जमिनी फ्लॅट किंवा गाळे दाखविल्यामुळे ही मालमत्ता लाचलुचपत विभागाला जप्त करता येत नव्हती. लाचखोराची ही शक्कल उधळली गेली आहे. यापुढे आपण लाच खाल्ली तर त्याचे परिणाम पत्नीला आणि मुला-मुलींना भोगावे लागतील. आपल्याबरोबर त्यांनाही अटक होऊ शकते, तसेच त्यांच्यावर गुन्हे दाखल होऊ शकतात. यापुढे लाचखोरी करणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला स्वत:बरोबर कुटुंबालाही बदनाम व्हावे लागेल. निदान कुटुंबाची प्रतिष्ठा टिकवायची असेल तर त्याला आपल्या लाचखोरीला लगाम घालावा लागेल. कारण यापुढे स्वत:बरोबर सगळ्या कुटुंबाची छीथू करून घेण्याची वेळ येऊ शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतके दिवस ही लाचखोरी दडवण्याला संधी मिळत होती ती आता मिळणार नाही.

### मंत्र्याविरुध्द कारवाई करा

बऱ्याच वर्षांनंतर लाचखोरीविरुध्द हे प्रभावी पाऊल उचलले गेले आहे. महाराष्ट्र असे एकमेव राज्य असावे की त्यांनी ही अभिनव कारवाई शोधून काढली असावी. याबद्दल लाचलुचपतविरोधी विभागाचे महासंचालक प्रवीण दीक्षित यांचे अभिनंदन केले पाहिजे. आतापर्यंत त्यांनी अनेक नवनवीन उपाययोजना शोधून काढल्या.त्यामध्ये तक्रार करण्याचे नाव गुप्त ठेवण्यापासून ते त्याला संरक्षण देण्यापर्यंत किंवा लाचखोरांना ताबडतोब जाळ्यात पकडता यावे म्हणून सरकारी कार्यालयाच्या बाहेर मोबाईल व्हॅन तैनात करण्याचे उपाय त्यांनी अंमलात आणले. नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीप्रमाणे गेल्या वर्षीपेक्षा यंदा दुप्पट लाचखोर अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना रंगेहात पकडण्यात या विभागाला यश आले. या वर्षभरात संपूर्ण राज्यात १ हजार ५ जणांना पकडले गेले आहे. अर्थात तक्रारीवरून आणि सापळा रचून हे अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले. परंतु यापेक्षाही बरेच तरबेज आणि सराईत लाचखोर अजूनही भ्रष्टाचाराचा धुमाकूळ घालत आहेत.त्यांनादेखील वठणीवर आणायचे असेल तर लोकांनी सहकार्य केले पाहिजे आणि सरकारी कर्मचारी संघटनांनी अशा लाचखोरांचा निषेध केला पाहिजे. भ्रष्टाचार हा भयंकर रोग आहे तो वाढविण्याचे काम राजकारणी लोकही करीत असतात. या सरकारी कर्मचारी अधिकाऱ्याविरुध्द लाचलुचपत विरोधी विभागाने जशी मोहीम उघडली आहे तशीच मंत्री आणि नेत्यांविरुध्द सुरू केली पाहिजे. नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अशा नेत्यांवर खटले भरण्याकरिता यापुढे सरकारच्या परवानगीची वाट पाहावी लागणार नाही, असे आश्वासन दिले आहे. आता त्या दिशेने वेगाने अंमलबजावणी झाली पाहिजे.